सकाळ

# सायबर वॉरियर्सनी समाजात जनजागृती करावी

## अनुपमा काटकर : डी. वाय. पाटील कृषी विद्यापीठात सायबर वॉरियर्स क्लबचे उद्‌घाटन

■ सकाळ वृत्तसेवा




तळसंदे : क्वीक हिल फाउंडेशनच्या अनुपमा काटकर यांचे स्वागत करताना प्रा. डॉ. के. प्रथापन. समवेत प्रा. डॉ. जयेंद्र खोत, डॉ. संग्राम पाटील, डॉ. वर्षा देसाई, अजय शिर्के आणि सायबर वॉरियर्स.

घुणकी, ता. ३० : 'आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात सायबर क्राईमचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहेत. त्यामुळे सायबर सुरक्षेबाबत जनजागृती करणे गरजेचे आहे. डी. वाय. पाटील कृषी व तंत्र विद्यापीठाचे सायबर वॉरियर्स हे काम उत्तम पद्धतीने करतील,' असा विश्वास क्वीक हिल फाउंडेशनच्या अध्यक्षा अनुपमा काटकर यांनी व्यक्त केला.

क्वीक हिल फाउंडेशनच्या वतीने 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या उपक्रमांतर्गत तळसंदे (ता. हातकणंगले) येथे डी. वाय. पाटील कृषी व तंत्र विद्यापीठात सायबर वॉरियर्स क्लबचे उद्‌घाटन करण्यात आले. यावेळी काटकर बोलत होत्या. कार्यक्रमास विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. के प्रथापन, कुलसचिव प्रा. डॉ. जयेंद्र खोत, क्वीक हिल फाउंडेशनचे कार्यकारी संचालक अजय शिर्के, सीएसआर प्रोजेक्टचे संचालक गायत्री पवार व वीरेंद्र उपस्थित होते.

काटकर म्हणाल्या, 'आजचे युग माहिती-तंत्रज्ञानाचे आहे. मात्र, प्रगत तंत्रज्ञाचा गैरवापर करून सायबर क्राईमचे प्रमाण वाढले आहे. बेकायदेशीर हॅकिंग, ऑनलाइन फसवणूक याळे आपला डेटा सुरक्षित ठेवण्याची नितांत गरज आहे. त्यासाठी सायबर साक्षरता वाढवणे गरजेचे आहे.'

कुलगुरू प्रा. डॉ. के. प्रथापन म्हणाले, 'क्वीक हिल फाउंडेशनचा हा उपक्रम कौतुकास्पद आहे. सायबर शिक्षा व सुरक्षा कार्यामध्ये योगदान देण्याची व या माध्यमातून सामाजिक बांधिलकीचे कार्य करण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळणार आहे.' कुलसचिव प्रा. डॉ. जयेंद्र खोत म्हणाले, 'सायबर गुन्हे कसे घडतात, ते कसे रोखता येतील याबाबत सायबर सुरक्षिततेची जाणीव या माध्यमातून रुजवली जाणार आहे. विद्यार्थ्यांची वैयक्तिक व सामाजिक प्रगतीसाठी हातभार लागणार आहे.'

अजय शिर्के यांचेही भाषण झाले. सायबर क्लबचा अध्यक्ष महंमदअली याने सायबर वॉरियर्स क्लबची तत्त्वे व मूल्ये याची प्रतिज्ञा घेतली. कार्यक्रमास गोगटे महाविद्यालय रत्नागिरी, कमला महाविद्यालय कोल्हापूर, यशोदा टेक्निकल कॅम्पस, केबीपी महाविद्यालय, सातारा येथील सायबर वॉरियर्स व समन्वयक डॉ. संग्राम पाटील व सर्व शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन संगणकशास्त्र व अभियांत्रिकी विभागातील डॉ. वर्षा देसाई व सायबर क्लबचे विद्यार्थी यांनी केले. कुलपती डॉ. संजय डी. पाटील, संस्थेचे उपाध्यक्ष आमदार सतेज पाटील, विश्वस्त आमदार ऋतुराज पाटील यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन मिळाले.